(113)

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/३३६२०/२०२० 11523 दिनांक :- २२/१०/२०२०

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 1378
दिनांक - 11/11/2020
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय :- कांदळवन वेबसाईटवर प्राप्त तक्रारीबाबत.**
**JNPT violates CRZ norms, destroys mangroves.**
**अर्जदार श्री.नंदकुमार पवार**

**संदर्भ :- आपल्या कार्यालयाकडील ई-मेल व्दारे प्राप्त तक्रार क्र.११३/५९.**

श्री.नंदकुमार पवार, श्री एकविरा आई प्रतिष्ठान यांनी जे.एन.पी.टी मार्फत कांदळवन ऱ्हास होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडून या कार्यालयाकडील पत्र दि.३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी पनवेल यांनी तहसिलदार उरण यांचेमार्फत चौकशी करुन दिनांक २२/१/२०२० व दिनांक २५/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) सदर तक्रारीच्या अनुषंगाने, तहसिलदार उरण, तलाठी सजा शेवा तसेच जे.एन.पी.टी. प्रशासनाचे प्रतिनिधी श्री.जे.एल.देशमुख सहाय्यक प्रबंधक, जे.एन.पी.टी व श्री.रामानंद जाधव, प्रबंधक, जे.एन.पी.टी. यांनी तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये नमुद केलेल्या प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली व सदर बाबत जे.एन.पी.टी. प्रशासनाकडून मध्य रेल्वे अंतर्गत डी.एफ.सी.सी.आय.अंतर्गत रेल्वे ट्रॅकचे काम चालू असल्याने तेथे भरावाचे काम सुरु आहे. सदर कामासाठी जे.एन.पी.टी. प्रशासनामार्फत एकूण क्षेत्र १९.५० हेक्टर एवढया क्षेत्राबाबत शासनाकडून परवानगी घेतलेली आहे.

२) भारत मुंबई कंटेनर टर्मिनलच्या सिंगापूर टर्मिनल गेटपासून पूर्व पश्चिम दिशेच्या उजव्या बाजुला जे.एन.पी.टी. ने भराव करुन रेल्वे ट्रॅकचे काम सुरु केलेले आहे. त्याअनुषंगाने भराव केलेल्या परिसराच्या डाव्या बाजुला काही सुकलेले कांदळवन आढळून आलेले आहेत. तरी, काही कांदळवन ही सुस्थितीत आढळून आलेली आहेत. तसेच कांदळवनाच्या डाव्या बाजूला सिंगापूर पोर्टचा रस्ता असून सदर रस्त्याला तारेचे फेन्सींग केलेले आहे. वरील बाबत जे.एन.पी.टी.सिंगापूर पोर्ट ४ चे बंदरकडून माहिती घेतली असता सदरचे काम हे या केंद्र शासनाचे सागरमाला कार्यक्रमातील असलेबाबत कळते. तसेच जे.एन.पी.टी.प्रशासनामार्फत पुढीलप्रमाणे परवानग्या सादर केलेल्या आहेत.

अ) व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, शेवा, ता.उरण, नवी मुंबई यांना जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलच्या विकासासाठी (रस्ता तसेच रेल्वे सोयीकरिता) उरण तालुका रायगड जिल्हयातील १९.५० हेक्टर इतकी कांदळवन वनजमिन वळती करण्याबाबत, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन आदेश क्रमांक एफएलडी-१३१५/ प्र.क्र.१०९/फ-१०, दि.७/७/२०१६ अन्वये प्राप्त परवानगीची प्रत.

ब) भारत सरकारच्या पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय यांचेकडील दि.७/८/२०१५ मान्यता पत्र.

क) उपवनसंरक्षक, अलिबाग वन विभाग यांचेकडील पत्र क्र.ब/२०/जमिन/१७४३/२०१६-१७ दि.-१२/७/२०१६.

जे.एन.पी.टी. तील सिंगापूर पोर्ट चौथे बंदर येथील उजव्या बाजुला जे.एन.पी.टी. चे रेल्वे रुळाचे काम चालू असून, सदर काम हे १९.५० हे.आर. मध्ये आहे. सदर ठिकाणचे जे.एन.पी.टी. प्रशासनाने आयआयटी मद्रास (चेन्नई) यांचेमार्फत १९.५० हेक्टरचे सर्व्हे करुन मॅपिंग केलेले आहे.

Steno
DCF(M)
13/11

तसेच परिक्षेत्र वन अधिकारी उरण यांनी चिफ मॅनेजर जे.एन.पी.टी यांना केंद्र शासनाचे व महाराष्ट्र शासनाचे अंतिम मान्यता पत्रामध्ये काही अटी व शर्ती यांच्या अधिन राहून चौथ्या कंटेनर टर्मिनल करिता रोड रेल्वेचे बांधकाम करण्याकरिता १९.५० हेक्टर कांदळवन क्षेत्र मागणीच्या प्रस्तावास परवानगी दिलेली आहे. तसेच उपवनसंरक्षक अलिबाग, वन विभाग यांनी वनिकरण योजनेअंतर्गत उरण परिक्षेत्रातील अवन क्षेत्र मौजे कळंबसुरु येथील सर्व्हे नं.१६७ क्षेत्र ३९ हेक्टरमध्ये मिश्र स्थानिय प्रजातीची लागवड करण्यात आली आहे. त्याप्रमाणे जे.एन.पी.टी.ने उपवन संरक्षक अलिबाग, वन विभाग यांच्याकडे नष्ट झालेल्या कांदळवनाच्या लागवडीसाठी रक्कम रु.१,८३,१०,५००/-एवढे शुल्क अदा केलेले आहे.

जे.एन.पी.टी. ने सर्व शासकीय नियमांचे पालन करुन महसूल व वन विभागाकडील शासन आदेश क्र.एफ.एल.डी./१३१५/प्र.क्र.१०९/फ/१० दि.७/०७/२०१६ प्रमाणे जे.एन.पी.टी. पोर्ट शेवा, नवी मुंबई या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलचा रस्ता तसेच रेल्वेस प्रवेश करण्यासाठी प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या पत्रासह जोडलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशिलात नमुद केलेले आणि अनुसुचीमध्ये नमुद केलेले कांदळवन वनजमिन समाविष्ठ आहे अशी एकूण १९.५० हेक्टर कांदळवन वनजमिन प्रस्तावासाठी वळती करण्यात आलेली आहे. तरी, प्रत्यक्ष पाहणी वेळी जे.एन.पी.टी. प्रशासनाने वरील प्रकल्पासाठी १९.५० हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवरील कांदळवन तोडल्याचे आढळून येत नाही.

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालानुसार वस्तुस्थिती बाबत अहवाल व तहसिलदार उरण यांचेकडील अहवाल, जे.एन.पी.टी. प्रशासनाला दिलेल्या परवानग्याची प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडला आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

(विशाल दौंडकर)
**तहसिलदार (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय रायगड**

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पनवेल यांचे कार्यालय

जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड

दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२३२८ ईमेल panvelsdo@gmail.com

जा.क्र.जमिनबाब/कात-१/कांदळवन/ २२६/२०१९ / 163 दिनांक :- 22/०१/२०२०

प्रति,

मा. जिल्हाधिकारी रायगड

अलिबाग (महसूल शाखा)

विषय :- **Hindustan Times Dated २६/१२/२०१९**

JNPT destroyed १९ ha Mangroves in URan, activists tell MCZMA, HC panel

संदर्भ:- १. आपलेकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/ई-मेल/तक्रार/हिं.टा-१२/२०१९ दि. ०३/०१/२०२०

२. या कार्यालयाकडील पत्र जा. क्र./जमिनबाब/कात-१/कांदळवन/२२६/२०१९, दि. १०/०१/२०२०

३. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र जा.क्र.जमिनबाब/कात-१/कांदळवन/तक्रार/०१/२०२०, दि. १८/०१/२०२०

नवी मुंबई, पर्यावरण संस्था यांनी वरील विषयान्वये आपले कार्यालयाकडे तसेच कांदळवन कक्षाकडे दाखल केलेल्या तसेच सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. २६/१२/२०१९ रोजीच्या हिंदुस्थान टाईम्स मध्ये छापण्यांत आलेल्या बातमी बाबंत तहसिलदार उरण यांचेकडून स्थळपहाणी अहवाल मागविण्यांत आला होता. तहसिलदार उरण यांचेकडून संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये या कार्यालयास अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे.

१. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार उरण, तलाठी सजा शेवा तसेच जे.एन.पी.टी. प्रशासनाचे प्रतिनिधी श्री.जे.एल.देशमुख, सहाय्यक प्रबंधक, जे.एन.पी.टी. व श्री. रामानंद जाधव, प्रबंधक, जे.एन.पी.टी. यांनी तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये नमुद केलेल्या जागेवर प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली व सदर बाबत जे.एन.पी.टी. प्रशासनाकडुन मध्य रेल्वे अंतर्गत डी.एफ.सी.सी.आय. अंतर्गत रेल्वे ट्रॅकचे काम चालु असल्याने तेथे भरावाचे काम सुरु आहे. सदर कामासाठी जे.एन.पी.टी. प्रशासनामार्फत एकुण क्षेत्र १९.५० हेक्टर एवढया क्षेत्राबाबत शासनाकडुन परवानगी घेतलेल्या आहेत.

२. भारत मुंबई कंटेनर टर्मिनलच्या सिंगापुर टर्मिनल गेटपासुन पुर्व पश्चिम दिशेच्या उजव्या बाजुला जे.एन.पी.टी. ने भराव करुन रेल्वे ट्रॅकचे काम सुरु केलेले आहे. त्याअनुषंगाने भराव केलेल्या परिसराच्या डाव्या बाजुला काही सुकलेले कांदळवन आढळुन आलेले आहेत. तरी काही कांदळवन ही सुस्थितीत आढळुन आलेली आहेत. तसेच कांदळवनाच्या डाव्या बाजुला सिंगापुर पोर्टचा रस्ता असुन सदर रस्त्याला तारेचे फेन्सींग केलेले आहे. वरील बाबत जे.एन.पी.टी. सिंगापुर पोर्ट ४ चे बंदरकडुन माहिती घेतली असता सदरचे काम हे या केंद्र शासनाचे सागरमाला कार्यक्रमातील असलेबाबत कळते. तसेच जे.एन.पी.टी. प्रशासनामार्फत पुढीलप्रमाणे परवानग्या सादर केलेल्या आहेत.

३. व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, ता. उरण, नवी मुंबई यांना जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलच्या विकासासाठी (रस्ता तसेच रेल्वे सोयीकरीता) उरण तालुका रायगड जिल्हयातील १९.५० हेक्टर इतकी कांदळवन वनजमिन वळती करण्याबाबत, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन आदेश क्रमांक:एफएलडी-१३१५/प्र.क्र.१०९/फ-१० दि. ०७/०७/२०१६ प्राप्त आहेत.


४. भारत सरकारच्या पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय यांचेकडील दि. ०७/०८/२०१५ मान्यता पत्र.

५. उपवनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचेकडील पत्र क्र. ब/२०/जमिन/१७४३/२०१६-१७ दि. १२/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनाचे व महाराष्ट्र शासनाचे अंतिम मान्यता पत्रामध्ये काही अटी व शर्तींना अधिन राहुन अट क्र. २ जर काही रक्कम भरणा करणे आवश्यक असेल तर सदर रक्कम ई-चलना


व्दारेच प्रकल्प यंत्रणा भरणा करेल. यासदर्भात ज.एन.पा.टी. प्रशासनाने १,८३,१०,५००/- एवढी रक्कम शासनाकडे भरणा केलेली आहे. तसेच पर्यायी जागेसाठी वनिकरण योजनेअंतर्गत उरण परिक्षेत्रातील अवनत क्षेत्र (स.नं. १६७ मौजे कळंबुसरे येथील ३९.०० हेक्टर) येथे प्रस्तावित केले आहे. व त्यावर मिश्र व स्थानिय प्रजातींची लागवड करण्यात यावी असे नमुद केलेले आहे व वळतेकरणास मंजुरी प्राप्त क्षेत्र प्रकल्प यंत्रणेचे ताब्यात देण्याची नियमानुसार कार्यवाही करणेबाबत नमुद केलेले आहे.

वरीलप्रमाणे जे.एन.पी.टी. प्रशासनाने परवानग्या असल्याचे सादर केले आहे व परवानग्याची प्रत व प्रस्तावित कांदळवन दर्शविणारा नकाशा सोबत माहितीस्तव सविनय सादर केला आहे.

उप विभागीय अधिकारी
पनवेल उप विभाग पनवेल


JNPT
02/01/2005
Legend
Untitled Path
Google Earth
N
1000 ft


42




44




96




4e




69




82




(53)





JNPT
24/12/2013
Legend
Untitled Path
Google Earth
1000 ft
N

38




JNPT
09/12/2014
Legend
Untitled Path
Google Earth
Image © 2020 Maxar Technologies
1000 ft
N

69



JNPT
17/12/2015
Legend
Untitled Path
Google Earth
Image © 2020 Maxar Technologies
1000 ft

03





64


JNPT
25/12/2017
Legend
Untitled Path
Google Earth
Image © 2020 Maxar Technologies
1000 ft
N


JNPT
03/11/2018
Legend
Untitled Path
Google Earth
Image © 2020 Maxar Technologies
1000 ft
N


JNPT
23/11/2019
Legend
Untitled Path
Google Earth
1000 ft
N


JNPT
22/09/2020
Legend
Untitled Path
Google Earth
Image © 2020 Maxar Technologies
N
1000 ft


MOUZE- SHEVA , TALUKA- URAN, DISTRICT- RAIGAD
PLATE- II/42
N
Scale 1 : 5000
0 0.1 0.2 Km
INDEX MAP
0 1.25 2.5 Km
Source: 1. Village Cadastral Maps from Land Record Department, GOM.
2. Quick Bird Satellite Data of 60 cm. Resolution for the year 2006, 2008, 2009 and 2010
Prepared For
Mangrove Cell, Maharashtra Forest Department,
Mumbai - 400 001
Prepared By
Maharashtra Remote Sensing Applications Centre,
VNIT Campus, S.A. Road,
Nagpur - 440 010
Legend
Parcels
New Mangrove Parcel
Mangrove Dense
Mangrove Sparse
Mudflat
Others
Creek

(13)

-926-

सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल

व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, ता.उरण, नवी मुंबई यांना जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलच्या विकासासाठी (रस्ता तसेच रेल्वे सोयीकरीता) रायगड जिल्ह्यातील १९.५० हेक्टर इतकी कांदळवन वनजमिन वळती करण्याबाबत.

A-02
11/07/2016
जमिन

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१३१५/प्र.क्र.१०९/फ-१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ०७/०७/२०१६

वाचा:-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/II/आयडी.१२३५९/(५६)/२०८६/१४-१५, दिनांक ०४/०३/२०१५
२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक दिनांक [illegible]
३) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.एफसी-२/एमएच-०६/२०१५-एनजीपी/२१२, दिनांक ०७/०८/२०१५
४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक दिनांक ११/०३/२०१६
५) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र. एफसी-२/एमएच-०६/२०१५-एनजीपी/५७५, दिनांक २३/०६/२०१६
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/नोसेल/आरएस-२/आयडी.२३३८(१)/६३७/१६-१७, दिनांक ३०/०६/२०१६

आदेश :-

ज्याअर्थी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त आलेला जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलच्या विकासासाठी (रस्ता तसेच रेल्वे इ.सोयीकरीता) रायगड जिल्ह्यातील १९.५० हेक्टर इतकी कांदळवन वनजमिन वळती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता.

Land
0/7/2016

आणि ज्याअर्थी, व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई यांनी प्रस्तावित केलेली जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट [illegible] मरिन केमिकल टर्मिनलचा विकास (रस्ता तसेच रेल्वे इ. सायी) हा राज्याच्या फायद्याचा आहे, ह्यामुळे सर्वसाधारण जनतेला फायदा होणार आहे, म्हणजेच हा प्रकल्प एक लोकहितार्थ प्रकल्प असून, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम,१९८० च्या मार्गदर्शक [illegible] हा प्रकल्प स्थळ [illegible] (site specific) आहे, तसेच सदर प्रकल्पासाठी पर्यायी वनेत्तर जमिन उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेण्यात आली;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अन्वये १९.५० हेक्टर वनजमिन वळती करण्याची वरील अ.क्र.२ अन्वये भारत सरकारला शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर नीट विचार करुन, राज्य शासनाने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली सादर केलेल्या प्रस्तावास वरील अ.क्र.-३ अन्वये तत्वत: मंजूरी दिलेली असून, ही मंजूरी भारत सरकारच्या दिनांक ०७/०८/२०१५ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने वरील अ.क्र.-४ येथील पत्रान्वये अटी पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांनी रायगड जिल्हयातील १९.५० हेक्टर इतकी कांदळवन वनजमिन उपरोक्त प्रकल्पासाठी काही अटींसह वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये वळती करण्यास अंतिम मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई यांना जनहित याचिका क्र ८७/२००६ च्या अनुषंगाने नोटीस ऑफ मोशन क्र.६०३/२०१५, दिनांक १५/०१/२०१६ अन्वये जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलच्या विकासासाठी (रस्ता तसेच रेल्वे इ. सोयी) कांदळवन क्षेत्रात काम करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी परवानगी दिली आहे,

पृष्ठ पर्हा ;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई यांना जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या बंदराच्या चौथ्या टर्मिनल व मरिन केमिकल टर्मिनलच्या (रस्ता तसेच रेल्वेस प्रवेश करण्यासाठी) विकासाकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या पत्रासह जोडलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशिलात नमूद केलेले आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली, ज्यामध्ये, कांदळवन वनजमिन समाविष्ट आहे, अशी एकूण १९.५० हेक्टर कांदळवन वनजमिन या प्रस्तावासाठी वळती करण्यात यावी. हे वळतीकरण भारत सरकारच्या दिनांक ०७/०८/२०१५ व दिनांक २३/०६/२०१६ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे.

१) वर नमूद केलेल्या भारत सरकारच्या तत्वतः मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२) भारत सरकारने दिलेल्या अंतिम मान्यतेच्या दिनांक २३/०६/२०१६ मधील अट क्र.७ ची काटेकोर अंमलबजावणी होईल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे यांनी दक्षता घ्यावी.

3) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १५/११/२०१६ रोजी दिलेल्या आदेशातील अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने करणे आवश्यक आहे.

४) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना, भारत सरकारच्या दिनांक ०७/०८/२०१५ व दिनांक २३/०६/२०१६ रोजीच्या पत्रातील अटी आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटीचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत उचित कारवाई करण्यात येईल.

५) उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non compliance) संबंधित मुख्य वनसंरक्षक / उप वनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दि.२५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

अनुसूची

| गावाचे नाव | तालुका व जिल्हा | सर्व्हे क्र | वैधानिक दर्जा | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| शेवा | तालुका उरण, जिल्हा रायगड | २१५pt, २९३pt, १८२pt, १८३pt | मॅंग्रुव्ह | १५.२२४८ |
| जासखर | | २९२pt, २९९pt, २९१pt, २७८pt | | ४.२७५ |
| | | | एकूण क्षेत्र | १९.५० |

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०७०७१६३३२५८३१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2016.07.07 16:40:02 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत-टप्पा-१ व टप्पा-२ च्या मंजूरी आदेशासह वरील आदेश आपल्या वेबसाइटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर

प्रत :

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा नोडल अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर
८. मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे
९. जिल्हाधिकारी, रायगड

[illegible] पैकी ७

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

११. उप वनसंरक्षक, अलिबाग

१२. व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई

१३. निवडनस्ती (फ-१०)

२. जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, उप वनसंरक्षक, अलिबाग यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी, तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखाच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित केले जातील याची खात्री करावी.

३. व्यवस्थापक, नियोजन व विकास विभाग, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्याचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे व उप वनसंरक्षक, अलिबाग यांना सादर करावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशाची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.